CMYK

बीड ▪ वर्ष ५ ▪ अंक १८७ ▪ शनिवार, दि. १५ नोव्हेंबर, २०२५ ▪ पोस्टल दिनांक १६ नोव्हेंबर, २०२५ ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ पाने ४ ▪ किंमत २ रु.

BEED ▪ Year-5 ▪ Issue-187 ▪ Saturday 15 November, 2025 ▪ Postal Date 16 November, 2025 ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ Pages 4 ▪ Price 2



# शिवछत्र करणार पप्पू कागदेंवर शिक्कामोर्तब!

सायं.दैनिक
www.beedkisan.in
बीड किसान
• संपादक : शेख कामरान •
BEED KISAN

## नाव निश्चित फक्त चिन्ह घड्याळ की रिपाइं चे यावर घोडे अडल्याची चर्चा



### पप्पू कागदे यांना न्याय

पप्पू कागदे हे चळवळीतील कार्यकर्ते असून, त्यांनी आजपर्यंत कोणत्याही पदाची अपेक्षा न करता काम केले आहे. त्यांचे काम हे सर्वसमावेशक असून, प्रत्येकाच्या मदतीला धावून जाणे हा त्यांचा स्वभाव आहे. यामुळे पप्पू कागदे यांना शहरात मानणारा मोठा वर्ग आहे. त्यांना विरोधक ही मानतात असा हा चेहरा असल्याने त्यांना उमेदवारी मिळत असल्याने सर्वांमधून त्यांच्या उमेदवारीचे स्वागत करण्यात येत आहे. या उमेदवारीने त्यांच्या कार्याला न्याय मिळाल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे.

## आज नावाची घोषणा होण्याची शक्यता

# पप्पू कागदे राहणार फायर ब्रॅन्ड उमेदवार!

**बीड । किसान न्युज**

येथील नगरपरिषदेच्या अध्यक्षपदासाठी माजी आ. अमरसिंह पंडित यांनी तगडा उमेदवार हेरला असून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने रिपाइं चे पप्पू कागदे यांच्या कुटुंबातील उमेदवार असणार यावर शिक्कामोर्तब केले असल्याची खात्रीलायक माहिती आहे. निवडणूक घड्याळ या चिन्हावर लढवायची की, रिपाइं च्या चिन्हावर येथे घोडं अडल्याची चर्चा आहे. तर पप्पू कागदे निवडणूकीच्या रिंगणात उतरले तर त्यांना रोखणे अशक्य असल्याची चर्चा आहे. आज दुपारी त्यांच्या नावाची घोषणा होण्याची शक्यता आहे. बीड नगरपरिषद अध्यक्षपद एससी महिलेसाठी राखीव राहिले असून, प्रथमच एससी महिला शहराची प्रथम नागरिक होणार आहे. यामुळे त्या पदाला साजेल असा अभ्यासु, शिक्षित व सर्वसमावेशक चेहरा असावा असा उमेदवार सर्वचजण शोधत आहेत. अनेक नावे चर्चेत आहेत. परंतु राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाने पप्पू कागदे यांच्या रुपाने तगडा उमेदवार हेरला असून त्यांच्याच कुटुंबातील उमेदवार नगराध्यक्षपदासाठी असणार हे निश्चित झाले आहे. परंतु अमरसिंह पंडित यांची मागणी आहे की, त्यांनी घड्याळ या चिन्हावर निवडणूक लढवावी तर पप्पू कागदे हे रिपाइं मध्ये काम करीत असून बीड जिल्ह्यात रिपाइं अन् पप्पू कागदे हे एका नाण्याच्या दोन बाजू समजले जातात. यामुळे त्यांची इच्छा ही रिपाइं जो चिन्ह निवडणुकीत वापरतो त्याच चिन्हावर लढवण्याची इच्छा आहे. यावर दोन्ही कडून सध्या खलबत सुरू असून, अमरसिंह पंडित पप्पू कागदे यांनाच उमेदवारी देण्यासाठी आग्रही असून, शिवछत्रचा आशीर्वाद असल्याने त्यांच्याच नावाची घोषणा होईल असा अंदाज आहे. तर आजच दुपारी पप्पू कागदे यांच्या नावाची घोषणा होऊ शकते अशी शक्यता आहे. यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसने तगडा उमेदवार शोधल्याची चर्चा आहे. तर पप्पू कागदे यांच्या कुटुंबातील नगराध्यक्ष पदासाठी उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरला तर त्यांना रोखणे कोणाला ही शक्य होणार नाही अशी जोरदार चर्चा शहरात सुरू आहे. यामुळे त्यांच्या नावाची घोषणा कधी होते याकडे शहराचे लक्ष लागले आहे.

### समाजालाही त्यांच्या संघर्षाला बळ देण्याची संधी

पप्पू कागदे हे रिपाइं आणि समाजाशी एकनिष्ठ असून, अनेकजण पक्ष सोडून विविध पदे प्राप्त करुन त्यांनी स्वतःची सोय केली. परंतु पप्पू कागदे हे रिपाइं मध्येच पाय रोवून उभे आहेत. त्यांचा समाजासाठी संघर्ष सुरू आहे. गायराण प्रश्न असू की, इतर कोणत्याही संकटात ते नेहमीच समाजासाठी रस्त्यावर उतरून आंदोलन करीत आहेत. यामुळे या संघर्षील कार्यकर्त्याला मतदान रुपी आशीर्वाद देऊन बळ देण्याची संधी आली आहे. या संधीचे समाज नक्कीच सोने करेल अशी चर्चा सुरू आहे.

# लोकशाहीच्या दरवाज्यावरच संशयाची सावली

**विशेष । संपादकीय**

**बिहार विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाले आणि पुन्हा एकदा भारतीय जनता पक्षाने सत्ता काबीज केली. परंतु विजयाची ही घोषणा जितकी स्पष्ट होती, तितकाच जनतेतील असंतोषही प्रकर्षाने उमटत आहे. मतमोजणीच्या प्रत्येक टप्प्यावर दिसलेली चढउतारांची धांदल, अनेक ठिकाणी उमटलेली पुनर्मोजणीची मागणी, ईव्हीएमवरून उठलेल्या शंकांची धग–या सगळ्यामुळे लोकशाहीच्या मुकुटावर संशयाचे ढग दाटून येताना स्पष्ट दिसत आहेत.**



विजयाचा उत्सव–की जनमताचा प्रश्न? भाजपाने हा विजय प्रचंड जनसमर्थनाचे प्रतिक म्हणून पेश केला असला, तरी जमिनीवरील वास्तव त्याला संपूर्ण दुजोरा देत नाही. ग्रामीण भागात आणि विविध मतदान केंद्रांवर नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर मतदान प्रक्रियेबाबत तक्रारी नोंदवल्या. 'मत दिलं पण मशीनमध्ये दिसलं नाही', 'बटण दाबले तरी वेगळा चिन्ह लागला'– अशा अनेक आरोपांनी वातावरण तापवलं. निवडणूक आयोग सतत ईव्हीएम मशीन पूर्ण सुरक्षित असल्याचं सांगत असतो; परंतु प्रत्येक निवडणुकीनंतरच या यंत्रांबाबत संशय निर्माण होणे ही लोकशाहीसाठी धोक्याची घंटा नाही का? जर मशीन त्रुटीरहित असतील, तर एवढ्या मोठ्या प्रमाणात आरोप का उद्भवतात? आणि उद्भवल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार? लोकांचा रोष–आणि सत्तेची शांतता निवडणूक निकालानंतर अनेक जिल्ह्यांमध्ये नागरिकांनी आंदोलन केली. स्थानिक स्तरांवर उमेदवारांनी शांत पण ठाम विरोध नोंदवत 'मतदान प्रक्रियेची पारदर्शकता' हा मूलभूत मुद्दा पुन्हा समोर आणला. जनतेचा विश्वास डळमळीत होणे ही कोणत्याही पक्षासाठी–विजयी असो वा पराभूत–धोक्याचीच बाब आहे. परंतु सत्ताधारी पक्षाने या प्रश्नांकडे पाहण्याची शैली वेगळीच आहे. विजयाच्या गजरात हे आरोप 'पराभूतांचे हताश स्पष्टीकरण' म्हणून उडवून लावले जात आहेत. पण खरे प्रश्न अजूनही अनुत्तरित आहेत. ईव्हीएम–लोकशाहीला की सत्तेला? ईव्हीएमवरचा वाद आता नवीन नाही. प्रत्येक निवडणुकीनंतर तो चिघळतो. अनेक लोकशाही देश आजही कागदी मतदानाचा आग्रह धरतात, कारण पारदर्शकतेचा पाया संशयमुक्त प्रक्रियेवर असतो. मग भारतात एवढ्या मोठ्या लोकशाहीत जनतेचा विश्वास जपण्यासाठी पर्यायी व्यवस्था, कागदी मतमोजणीचा समांतर आधार किंवा स्वतंत्र ऑडिट का राबवले जात नाही? जर निवडणूक आयोग आणि सरकार दोघेही 'ईव्हीएम निर्दोष' म्हणून ठाम असतील, तर मग हे सिद्ध करण्यासाठी लोकांसमोर अधिक खुले, पारदर्शक आणि स्वतंत्र चाचण्या का घेतल्या जात नाहीत? लोकशाहीचे रक्षण–सत्तेच्या विजयापेक्षा मोठेभाजपाचा हा विजय निवडणुकीच्या आकड्यांमध्ये नोंदला जाईल, पण खरी परीक्षा आता सुरू होते–लोकशाहीवरील विश्वास परत मिळवण्याची. निवडणुकीत विजय मिळवणे आणि लोकांचा विश्वास मिळवणे यात फरक आहे. लोकशाही केवळ मतांच्या संख्येवर टिकत नाही; ती प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर, नागरिकांच्या विश्वासावर आणि संस्थांच्या स्वायत्ततेवर उभी असते. आज बिहारमधील जनतेचा रोष हा केवळ निवडणूक निकालाविरुद्ध नाही; तो विश्वासघाताच्या भीतीविरुद्ध आहे. राजकारण कोणतेही असो; पण जर जनता मशीनवर अविश्वास व्यक्त करू लागली, तर ती कोणत्याही सत्तेला दिलेली सर्वात मोठी चेतावणी असते. भाजपाने हा विजय टिकवायचा असेल, तर अहंकार नव्हे–तर पारदर्शकतेचा मार्ग निवडणंच गरजेचं आहे. अन्यथा लोकशाहीच्या मशीनमध्ये घुसलेली ही शंकेची वाळू एक दिवस संपूर्ण यंत्रणेला अडवून ठेवू शकते.

## बीड मध्ये सोशल मिडीया वॉर सुरु

# होत नसतंय,बीड क्षीरसागर मुक्त

### योगेश पर्व फेसबुक पेज वरुन पोस्ट; पंडित, क्षीरसागर यांच्यात रंगला कलगीतुरा




**बीड । किसान न्युज**

**नगरपरिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसने सुत्र पंडितांच्या हाती दिल्याने क्षीरसागर विरोधकांकडून बीड क्षीरसागर मुक्त करु असे म्हटले जात आहे. याला उत्तर म्हणून होत नसतं,बीड क्षीरसागर मुक्त असा नारा देत योगेश पर्व फेसबुक पेज वरुन करण्यात आली. यामुळे आता पंडित, क्षीरसागर यांच्या समर्थकांमध्ये कलगीतुरा रंगला असल्याचे दिसून येत आहे.**

डॉ. योगेश क्षीरसागर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षात प्रवेश केल्यानंतर अवघ्या वर्षभरात पक्षाची बीड विधानसभा मतदारसंघ आणि शहरात चांद्या पासून बांद्या पर्यंत बांधणी केली. बूथ निहाय पक्षाची ताकद निर्माण केली. पण गटबाजी करुन नेहमीच त्यांना विरोध करण्यात येतो. याला जिल्ह्यातील काही नेत्यांची फूस असल्याची चर्चा आहे. ऐन नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांची कोंडी करीत एकटे पाडण्याचा प्रयत्न झाला आहे. या गटबाजीला कंटाळून त्यांनी पक्ष श्रेष्ठिंना याबाबत माहिती दिली. आघाडी बनविण्याची तयारी सुरू केली. यामुळे बीड नगरपरिषदेचे अधिकार पंडितांच्या हाती दिल्याची चर्चा सुरू आहे. यानंतर क्षीरसागर विरोधकांनी क्षीरसागर मुक्त बीड अशी चर्चा सुरू केली. याला क्षीरसागर समर्थकांनी जोरदार प्रतिउत्तर दिले. योगेश पर्व वरु 'होत नसत बीड क्षीरसागर मुक्त' अशी पोस्ट करण्यात आली. अशा पोस्ट क्षीरसागर समर्थकांकडून करण्यात येत आहे. यामुळे आता पंडित आणि क्षीरसागर समर्थकांमध्ये » पान २ वर

# अजित दादा तुमच्या पक्षाचे दाखवायचे वेगळे अन् खायचे दात वेगळे होत चाललेत!

### दादा पक्षातील गटबाजीने राष्ट्रवादीत मुस्लिम समाजाची बाजू मांडणाऱ्या नेत्यांची 'गोची' होत आहे; सलीम सारंग, रुपाली ठोंबरेंना पक्षाच्या स्टार प्रचारक पदावर ठेवले नाही!





**मुंबई । किसान न्युज**

**अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मुस्लिम समाजाशी निगडित विषयांवर भूमिका मांडणाऱ्या नेत्यांची अडचण वाढत असल्याच्या चर्चेला उधाण आले आहे. पक्षात घेतल्या जाणाऱ्या निर्णयांमुळे मुस्लिम नेतृत्वाकडे दुर्लक्ष होतेय का? असा प्रश्न आता स्वतः पक्षातील कार्यकर्त्यांतूनही मोठ्या प्रमाणात उपस्थित केला जात आहे. अजित पवारांचे दाखवायचे दात वेगळे अन् खायचे वेगळे अशी चर्चा सुरू झाली आहे.**

सलीम सारंग आणि रुपाली पाटील या दोघांची उदाहरणे नुकतीच चर्चेत आली. सलीम सारंग यांना आगामी निवडणुकांच्या अनुषंगाने कोणत्याही जवाबदारीच्या पदावर ठेवले गेले नाही. त्यांनी पूर्वी संग्राम जगताप यांना उघडपणे विरोध केला होता. त्यांच्या या भूमिकेमुळेच त्यांना बाजूला केले का, असा प्रश्न अनेकांच्या मनात निर्माण झाला आहे. दुसरीकडे, राष्ट्रवादीच्या प्रवक्त्या असलेल्या रुपाली पाटील यांचे पक्षाने अचानक पद काढून घेतले. शनिवार वाड्यात झालेल्या नमाज पठण प्रकरणी त्यांनी मुस्लिम समाजाची भूमिका मांडली होती. नेमकं मुस्लिमांचा मुद्दा त्यांनी उचलून धरल्यानंतरच प्रवक्ते पद काढले गेल्याने पक्षाच्या निर्णयामागचे » पान २ वर

### सुनिल तटकरेंकडून दादाच्या जवळच्या नेत्यांना दे धक्का.!



राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गट मध्ये मोठ्या प्रमाणात गटबाजी सुरू झाली आहे २०२४ मध्ये स्टार प्रचारक असलेल्याना अनेक मोठ्या नेत्यांना २०२५ मध्ये नवीन यादीतून वगळण्यात आले आहे या बदलण्याचा फटका येत्या निवडणुकीत दादाच्या पक्षाला बसू शकतो या नव्या यादीतून माजी मंत्री छगन भुजबळ ,खासदार सुनेत्रा पवार, अविनाश आदीक ,मंत्री दिलीप वळसे, राज्याचे उपाध्यक्ष सलीम सारंग ,विद्यार्थी राष्ट्रीय अध्यक्ष चैतन्य मानकर ,खासदार नितीन पाटील, राष्ट्रवादी अल्पसंख्याक असेल चे राष्ट्रीय अध्यक्ष जलीलुद्दीन सय्यद, आणि युवक राष्ट्रीय अध्यक्ष धिरज शर्मा यांची नावे पुसली गेली आहेत ही सर्व मंडळी अजित पवार यांच्याशी घट्ट संबंधित असल्यामुळे यांना तटकरे कडून बाजूला ठेवण्यात आल्याची चर्चा सुरू आहे.

स्थानिक सोने चांदीचे भाव..

पंकज ज्वेलर्स
पिंगळे गल्ली, कारंजा रोड, बीड
9850643058

| | |
|---|---|
| सोने २४ कॅरेट | 126,500 |
| २२ कॅरेट | 124,000 |
| चांदी प्रतिकिलो | 155,000 |

# शिवसेना उध्दव ठाकरे बीड विधानसभा संपर्क प्रमुखपदी मुजीब शेख यांची निवड

**बीड । किसान न्युज**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात संघटनात्मक बळकटीसाठी महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला असून मुजीब शेख यांची बीड विधानसभा संपर्क प्रमुखपदी निवड करण्यात आली आहे. पक्षात दीर्घकाळ सक्रिय राहून कार्यकर्त्यांमध्ये भक्कम पकड निर्माण केलेल्या शेख यांच्या नियुक्तीचे सर्वत्र स्वागत होत आहे. मुजीब शेख हे मूळचे संगमनेर येथील असून ते शिवसेनेचे निष्ठावान शिवसैनिक म्हणून ओळखले जातात. त्यांनी माजी



जिल्हाप्रमुख म्हणून कार्य करताना संघटन विस्तारात उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. बीड जिल्ह्यात त्यांच्या नातेवाईकांचा व सामाजिक स्तरावर चांगला संपर्क असल्याने त्याचा फायदा पक्षाच्या पुढील राजकीय रणनीतीत मोठ्या प्रमाणात होणार असल्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. पक्षातील कार्यकर्त्यांना एकत्रित ठेवणे, बीड विधानसभा क्षेत्रात संघटन मजबूत करणे आणि जनसंपर्क वाढविणे या दिशेने शेख यांची नियुक्ती फायदेशीर ठरणार असल्याचे वरिष्ठांनी स्पष्ट केले आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे आगामी काळात बीडमधील पक्षाची ताकद अधिक वाढेल, असा विश्वास शिवसैनिकांत व्यक्त केला जात आहे.

# पालिका निवडणुकांची तयारी वेगात; कलेक्टर विवेक जॉनसन यांनी नगरपालिकेला दिल्या भेटी

### राज्य निवडणूक आयोगाची अधिसूचना व प्रशिक्षण कार्याला गती

**बीड । किसान न्युज**

राज्यातील २६६ नगरपरिषद व ४२ नगरपंचायतांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी राज्य निवडणूक आयोगाने सुरू केलेल्या प्रक्रियेला आता वेग आला आहे. ४ डिसेंबर २०२५ रोजी जाहीर झालेल्या कार्यक्रमानुसार बीड जिल्ह्यातील बीड, गेवराई, माजलगाव, धारूर, पाटोदा, अंबाजोगाई यांसह इतर नगरपरिषदांमध्ये निवडणुकांच्या कामकाजावर विशेष लक्ष ठेवण्यात येत आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी श्री. विवेक जॉनसन





यांनी संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेऊन निवडणूक प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक व कायदेशीर रीतीने पार पाडण्यासाठी आवश्यक सुचना दिल्या. बैठकीत » पान २ वर

CMYK